आमचे प्रेरणास्थान

ISBN:978-81-980033-5-5



स्व. काशिनाथ चराटी
(आण्णा)



स्व.माधवराव देशपांडे
(भाऊ)

जनता एज्युकेशन सोसायटी, आजरा संचालित

# आजरा महाविद्यालय, आजरा

ता. आजरा, जि. कोल्हापूर

## अर्थशास्त्र विभाग

आणि

## शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर
## (सुयेक)

### ३५ वे वार्षिक अधिवेशन

**रविवार दि. ५ जानेवारी, २०२५**

# शिवार्थ

## स्मरणिका-२०२५

**विषय :**

१. कृषी प्रक्रिया उद्योगाचे अर्थशास्त्र

२. राज्य वित्तीय व्यवस्थापन : समस्या, उपाय आणि भवितव्य

**अंक २३ वा**

अध्यक्ष
प्रा.एम.जी.पाटील

शिवार्थ संपादक
प्रा.डॉ.जयवंत इंगळे

स्थानिक संपादक
डॉ.संजय चव्हाण

# शिवार्थ

स्मरणिका-२०२५

ISBN:978-81-980033-5-5

प्रकाशन स्थळ :
आजरा महाविद्यालय, आजरा

प्रकाशन काळ :
वार्षिक

मुद्रक :
श्री स्वामी समर्थ प्रिंटींग प्रेस, मेढा

प्रमुख संपादकाचे नाव :
प्रा.डॉ.जयवंत इंगळे

प्रकाशन :
रविवार दि. ५ जानेवारी २०२५

या अंकातील शोधनिबंधात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही

ISBN:978-81-980033-5-5

# INDEX



| Sr. No. | Paper name / Editor Name | Page No. |
|---|---|---|
| 38 | Sugarcane Processing Industry in MAHARASHTRA<br>Smt. Ashwini Raghunath Kadam/ Dr. A.K. Patil | 140-143 |
| 39 | Economics of Cashew Processing Industry<br>Miss.Patil Swapnali Rajendra | 144-149 |
| 40 | The Roll of Agro-Based Industries in Sustainable Development<br>Dr. Tukaram Maruti Rabade / Dr. Ashok Vilas Jadhav | 150-152 |
| 41 | Problems and Opportunities of Rice Mills in the Kolhapur District<br>Dr. Sambhaji S. Sawant | 153-154 |
| 42 | A Study of Sustainable Development through Agro-Processing Industries in Maharashtra<br>Dr. Vilas Shankar Bodagir | 155-158 |
| 43 | The roll of Agro-Processing in Agriculture Development of India<br>Mrs. Sawant Satvashila Ramesh | 159-160 |
| 44 | A study Challenges and Opportunities before Ethanol Production in Maharashtra<br>Dr. B.M. Jadhav | 161-163 |
| 45 | The roll of Dairy Industries in Rural Development of Maharashtra<br>Dr. Jaydeep Uttamrao Dixit | 164-167 |
| 46 | An Exploratory Study of Turmeric Trade in Sangli District of Maharashtra, India<br>Dr.Manohar A. Kore | 168-169 |
| 47 | The roll of Agri Complementary Business to Economics and Social Development of Farmers in India<br>Dr. Rajaram M. Kamble | 170-173 |
| 48 | Circularity in Dairy Farming : Opportunities for Economic Transformation<br>Dr. Kavita Shrikant Vadrale/ Dr. Rashmi Godhi | 174 |
| | **राज्य वित्तीय व्यवस्थापन: समस्या उपाय आणि भवितव्य** | |
| 1. | महाराष्ट्राचा वित्तीय लेखा-जोखा<br>डॉ.सोमनाथ विष्णू काळे, डॉ.कैलास सुनील पाटील | 175-178 |
| 2. | महाराष्ट्राचा कर्जबाजारीपणा आणि राजवित्तीय धोरण<br>प्रा. किशोर गजानन सुतार, प्रा.डॉ. संजय धोंडे | 178-185 |
| 3. | वित्त आयोगातील महसुलात सर्वात जास्त हिस्सा असणारे राज्ये व महाराष्ट्र यांचा चिकित्सक अभ्यास<br>प्रा. डॉ.संतोष शेळके | 186-187 |
| 4. | मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना : चिकित्सक विश्लेषण<br>डॉ. ज्ञानराजा चिघळीकर | 188-192 |

ISBN:978-81-980033-5-5

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना : चिकित्सक विश्लेषण

डॉ. ज्ञानराजा चिघळीकर
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या वतीने राज्यातील महिलांच्यासाठी दिनांक २८ जून २०२४ रोजी मान्यता देवून, जुलै २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरु केली. योजनेच्या प्रस्तावनेतच असे सांगण्यात आले कि, राज्यातील महिलामध्ये ॲनिमियाचे प्रमाण ५० टक्के पेक्षा जास्त आहे. तसेच राज्यातील श्रमबल पाहणीनुसार पुरुषांची रोजगाराची टक्केवारी ५९.१० टक्के व स्त्रियांची टक्केवारी २८.७० टक्के इतकी आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेवून राज्यातील महिलांच्या आर्थिक व आरोग्य विषयक परिस्थितीमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा होईल याबरोबरच कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत होईल असा विश्वास राज्य सरकारला वाटतो. योजनेसाठी प्रतिवर्षी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. २१ ते ६५ या वयोगटातील पात्र महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपये जमा करण्याची हमी सरकारच्या वतीने देण्यात आलेली आहे. तर निवडणूक जाहीरनाम्यात २१०० रुपये देण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. अशा प्रकारच्या कल्याणकारी योजना सुरु करणे गरजेचे असले तरी, त्यांची व्याप्ती आणि अंमलबजावणी मर्यादित स्वरुपाची न राहता ज्या वर्गासाठी योजना सुरु करण्यात आली आहे त्या वर्गाला कांही अटी घालून वंचित ठेवणे योग्य होणार नाही. सदर शोधनिबंधाच्या माध्यमातून योजनेचा उद्देश, तरतुदी आणि अंमबजावणी संदर्भात चिकित्सक विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**संशोधनाचा उद्देश:**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा उद्देश, तरतुदीं आणि अंमलबजावणीचा चिकित्सक अभ्यास करणे.

गृहीतक :

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा उद्देश, तरतुदी आणि अंमलबजावणी यात विसंगती असून, त्यात व्यापक बद्दल करता येवू शकतात.

पद्धती :

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना : एक दृष्टीक्षेप' हा शोधनिबंध पूर्णपणे माहितीच्या दुय्यम साधनसामग्रीवर अवलंबून आहे. याकरिता 'हाराराष्ट्र शासनाची परिपत्रके, वेबसाईटवर प्रशिद्ध करण्यात आलेली माहिती, वर्तमानपत्रातील लेख आणि बातम्यांचा आधार घेवून चिकित्सक विश्लेषण करण्यात आलेले आहे.

संशोधनाचे महत्व :

महिला या आजही सामाजिक आर्थिकदृष्ट्या पुरुषांच्या तुलनेत मागासलेल्या आहेत. महिलांना खऱ्या अर्थाने सामाजिक-आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ही योजना अधिक व्यापक व सक्षम करणे आवश्यक आहे. ही भूमिका सदर शोधनिबंधाच्या माध्यमातून पुढे आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

संशोधनाची मर्यादा:

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेचे उद्देश, तरतुदीं आणि अंमलबजावणी संदर्भातच चिकित्सक विश्लेषण करण्यात आलेले आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा उद्देश तरतुदी आणि अंमलबजावणी :

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून ते संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत सर्व महामानवांनी महिलांचा सन्मान देवून त्यांना सामाजिक-आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. मुख्यमंत्री लाडकी माझी बहिण योजनेचे उद्देश सुद्धा तशाच प्रकारचे आहेत. परंतु ज्या पद्धतीने आणि ज्या वेळी ही योजना घाई-गडबडीत सुरु करण्यात आली तेंव्हाच लोकांच्या लक्षात आले कि यात राजकारणाचा वास आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यामध्ये महायुतीला फारसे यश मिळाले नाही म्हणून विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून योजना सुरु करण्यात आली. त्यामुळेच योजनेचे उद्दिष्ट व्यापक असले तरी, तरतुदी आणि अंमलबजवणी मध्ये मात्र विसंगती दिसून येते.

**योजनेचा उद्देश :**

१. राज्यातील महिला व मुलींना पुरेशा सोयी- सुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीस चालना देणे.
२. राज्यातील महिलांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे.
३. राज्यातील महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे.
४. राज्यातील महिलांना व मुलीना सशक्तीकरणास चालना देणे.
५. महिला आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा करणे.